# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक २५/०८/२०२४ (रविवार)

---

### पोस्टे खापा येथे अवैध दारूची विक्री करणा—या आरोपीविरूध्द कारवाई

दिनांक २४.०८.२०२४ रोजी पोलीस स्टेशन खापा येथील स्टाफ पोलीस स्टेशन खापा परीसरात पेट्रोलिंग करीता फिरत असता एका गोपनिय मुखबीरद्वारे खबर मिळाली कि, पोस्टे अंतर्गत मौजा कोथुळणा येथे कोदेगाव, नविन वस्ती खापा येथे अवैधरित्या गावठी दारू तसेच देशी दारूची विक्री होत आहे. अश्या खबरेवरून नमुद मौजा कोथुर्णा येथे रेड कारवाई केली असता किचनमध्ये **एका प्लास्टीक डबकीत मोहाफुल गावठी दारू १५ लिटर कि.७५०/ — रू** ची अवैधरित्या मिळाल्याने **आरोपी नामे— मयुर धनराज केवटे वय. २७ वर्ष रा. वार्ड क्रं.०१ कोथुर्णी ता. सावनेर जिल्हा. नागपूर यास ताब्यात घेवुन दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला.** .

तसेच मौजा कोदेगाव येथे राहणारा १) **हुराबी अमजद शाहा वय ४३ वर्ष रा. वार्ड क्रं.०३ कोदेगाव ता. सावनेर जिल्हा. नागपूर २) जिवन शंकर कोल्हे वय ४५ वर्ष रा. प्रभाग क्रं. ०४ नविन वस्ती खापा ता. सावनेर जिल्हा. नागपूर. याचे घराची दारूबाबत घरझडती घेतली असता त्याचे** घरामध्ये एका प्लास्टीक थैलीत देशी दारू भिंगरी संत्रा नं.१ च्या एकुण ३५ निपा प्रत्येकी किंमत ७०/—रू प्रमाणे **२४५०/—रू चा.माल** मिळुन आला. नमुद दोन्ही आरोपीस दारूबाबत चा परवाना विचारला असता परवाना नसल्याचे सांगितल्याने सदर मिळुन आलेला मूद्देमाल ताब्यात घेवुन आरोपीविरूध्द कलम ६५ ई महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वयें गुन्हा नोंद करून तपासात घेतला. सदर गुन्हयाचा पुढील तपास स.फौ/नारायण बोरकर पोलीस स्टेशन खापा हे करीत आहेत.

सदर कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री हर्ष पोद्दार आणि अपर पोलीस अधीक्षक श्री रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, पो हवा पंकज गजराज ठाकुर, प्रकाश नांदुरकर पोलीस नाईक संतोष भाऊराव परतेती, पो.शि पन्नालाल बटाऊवाले, यांनी पार पाडली.

## पोस्टे नरखेड येथे अवैध रित्या गावठी दारूची विक्री करणा—या आरोपीविरूध्द कारवाई

दिनांक २४.०८.२०२४ रोजी पोलीस स्टेशन नरखेड येथील स्टाफ पोलीस स्टेशन परीसरात पेट्रोलिंग करीता फिरत असता एका गोपनिय मुखबीरद्वारे खबर मिळाली कि, पोस्टे अंतर्गत मौजा पिठोरी येथे घरात अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू बाळगुन विक्री करीत आहे. अश्या खबरेवरून मौजा पिठोरी येथे रेड कारवाई केली असता आरोपीच्या ताब्यातुत **एका प्लास्टीक डबकीत मोहाफुल गावठी दारू ८० लिटर मोहाफुल गावठी दारू कि. ४०००/ — रू** ची मिळाल्याने **आरोपी नामे—** श्रावण रामाजी भारसाकरे वय ५५ वर्ष यांना दारूबाबत परवाना विचारला असता परवाना नसल्याचे सांगितल्याने त्यांना ताब्यात घेवुन त्याचेविरूध्द कलम ६५ (ई) मदाका सहकलम ४९ भारतीय न्याय संहीता अन्वयें गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पो हवा गजानन तितरे पो.स्टे नरखेड करीत आहे.

सदर कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री हर्ष पोद्दार आणि अपर पोलीस अधीक्षक श्री रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक श्री नागवे, पोलीस हवालदार गजानन तितरे, पोलीस अंमलदार शुभम मोरोकर यांनी पार पाडली

## पोस्टे मौदा येथे जुगार अड्यावर धाड ६ आरोपीवर कारवाई

दिनांक २४.०८.२०२४ रोजी पोलीस स्टेशन मौदा येथील स्टाफ पोलीस स्टेशन परीसरात पेट्रोलिंग करीता फिरत असता एका गोपनिय मुखबीरद्वारे खबर मिळाली कि, पोस्टे मौदा अंतर्गत गरदेव चौक येथे काही इसम लपुन छपुन पैशाची बाजी लावुन हारजीतचा खेळ खेळत आहे. अश्या खबरेवरून स्टॉफसह रेड कारवाई केली असता  नमुद आरोपी हे १) क्रिष्णा वासुदेव सोनकुसरे वय २४ वर्ष २) आकाश कैलाश नंदनवार वय २४ वर्ष ३) राकेश ओमशंकर निखारे वय ३१ वर्ष ४) विनोद बाळकृष्ण वाघ वय ३० वर्ष ५) सतीश मारोती धार्मिक वय २३ वर्ष ६) नाथुराम चतुरभुज राठोड वय ६१ वर्ष हे सर्व रा वार्ड क्र १६ गरदेव मौहल्ला मौदा यांना ताब्यात घेवुन तपासणी केली असता त्यांचे ताब्यातुन डावावरून व आरोपीच्या **ताब्यातून ५२ तासपत्ते व नगदी २२३०/—रू चा माल** मिळुन आल्याने त्यांचेविरूध्द जुगार कायद्याअंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला,

सदर कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री हर्ष पोद्दार आणि अपर पोलीस अधीक्षक श्री रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक श्री घोंगे, पोलीस हवालदार अनिल कोकोडे, पोलीस अंमलदार पोशि विनोद बडगे यांनी पार पाडली

पोलीस माहीती कक्ष
नागपुर जिल्हा ग्रा नागपुर